# संविधान ज्ञान परीक्षा (छोटा गट)

**विद्यार्थ्यांचे नाव - ---------------------------------------------------------------------------- इयत्ता - ----------------------**

**शाळेचे नाव - ------------------------------------------------------------------------------ विभाग - ---------------------**

**(प्रत्येक प्रश्न 2 गुणांना असेल.)**

**प्रश्न 1 – रिकाम्या जागी चौकटीतील योग्य शब्द निवडा.**

1. जे समाज शेकडो वर्षांपासून मागे राहिले होते, त्यांना इतर लोकांच्या सोबत आणण्यासाठी ----------- सुरू केले.
(संविधान, शिक्षण, आरक्षण, रोजगार)
2. संविधान सांगते की सर्व मुलांना ----------- व -------------- शिक्षण मिळाले पाहिजे.
(स्वस्त व मस्त, इंग्रजी व गणित, इंग्रजी व डिजिटल, समान व गुणवत्तापूर्ण)
3. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा ------------ करणे.
(स्वीकार, अस्वीकार, त्याग, प्रचार)

**प्रश्न 2 - खालील जोड्या लावा.**

| गट अ | गट ब |
|---|---|
| 1. लोकशाही | a. व्यक्तिच्या अधिकारांचे रक्षण |
| 2. धर्मनिरपेक्षता | b. एकतेतून समाजाची उभारणी |
| 3. बंधुता | c. सर्व धर्मांना समान वागणूक |
| 4. स्वातंत्र्य | d. मत देण्याचा हक्क सर्वांना |

**प्रश्न 3 – चूक की बरोबर लिहा.**

1.भारतीय संविधानात प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही धर्माचे पालन न करण्याचा हक्क आहे. ---------------
2. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत. ---------------

## खालील प्रश्नांच्या योग्य उत्तराच्या पर्यायाला ✔ खूण करा.

**प्रश्न 4 - आपण 26 जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून का साजरा करतो ?**

1. त्या दिवशी भारत स्वतंत्र झाला.
2. देशाचा कारभार भारतीय संविधानानुसार सुरु झाला.
3. महात्मा गांधी यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतो.
4. इंग्रज आपला देश सोडून पळून गेले.

**प्रश्न 5 - भारत देशाचे खरे मालक कोण?**

1. पंतप्रधान व इतर मंत्री 2. राष्ट्रपती 3. मुख्यमंत्री आणि इतर मंत्री 4. देशातील लोक

**प्रश्न 6 - 'आम्ही एकमेकांची भावंडांप्रमाणे काळजी घेऊ' हे संविधानातील पुढीलपैकी कोणते मूल्य आहे?**

1. समता 2. बंधुता 3. समानता 4. स्वातंत्र्य

**प्रश्न 7 - संविधानाने आपल्याला कोणकोणते स्वातंत्र्य दिले?**

A. पसंतीचा धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य
B. आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य
C. देशभरामध्ये कुठेही जाऊन राहण्याचे स्वातंत्र्य.
D. काम करण्याचे स्वातंत्र्य.

1. फक्त A व B बरोबर 2. फक्त C व D बरोबर 3. सर्व पर्याय चूक 4. सर्व पर्याय बरोबर

**प्रश्न 8 - भारत ही कोणाची जबाबदारी आहे?**

1. फक्त माझी 2. सामूहिक जबाबदारी 3. फक्त सरकारची 4. फक्त श्रीमंत लोकांची

**प्रश्न 9 - कोणत्याही धर्माच्या सणाला तुमच्या मित्राला शुभेच्छा देणे हे संविधानाचे कोणते तत्त्व आहे?**
1.सहिष्णुता 2. धर्मनिरपेक्षता आणि बंधुता 3. सांस्कृतिक विविधता 4. व्यक्तिगत स्वातंत्र्य

**प्रश्न 10 - आपल्या देशाची संपत्ती ही कोणासाठी वापरली पाहिजे?**
1. समाजातील गरीब व दुर्बल घटकांसाठी 2. फक्त मंत्री मंडळातील लोकांसाठी
3. श्रीमंत लोकांसाठी 4. उद्योगपतींसाठी

**प्रश्न 11 - इतर देश वेगळे झाले पण भारत टिकला कारण ................**
1. भारतातील लोकांना विविधतेतील एकतेचे महत्व कळत होते. 2. भारतीय संविधानाने विविधतेचा सन्मान केला.
3. भारतीयांमध्ये विविधतेवरून कधी वादच झाले नाहीत. 4. भारतीयांनी स्वयंप्रेरणेने ठरवले होते.

**प्रश्न 12 - महिलांना छळ आणि भेदभावापासून संरक्षण देण्यासाठी संविधानाने काय केले?**
1. शिक्षणाची सोय केली 2. रोजगार निर्माण केले 3. कायदे केले 4. पोलीस.

**प्रश्न 13 - थोड्या लोकांच्या हातात काय केंद्रित होवू नये (एकवटू नये) असे संविधान म्हणते?**
1. जंगल 2. संपत्ती 3. जमीन 4.वरील सर्व

**प्रश्न 14 - स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, महानगरपालिका) का स्थापन केल्या?**
1.लोकांचा छळ होवू नये म्हणून 2. शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे म्हणून
3. लोकांना सत्तेत सामील होता यावे म्हणून 4. जनतेला कर्ज मिळावे म्हणून

**प्रश्न 15 - खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1. संविधानामुळे गरिबांना काय मिळाले?**

---

---

---

**2. आपल्या संतांची कोणती मूल्ये संविधानात आली आहेत?**

---

---

---

**3. संविधानातील कोणतीही २ मूलभूत कर्तव्ये लिहा.**

---

---

---

**4. शेतकऱ्याला संविधानाने काय दिले?**

---

---

---

**5. भारतात कोणकोणत्या बाबतींत वेगळेपण आहे? ते चांगले की वाईट? कसे?**

---

---

---